# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.12.2025** **वारःबुधवार**

---

•विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजिविका अभियान विधेयक लोकसभेत सादर

•प्रशासन आणि राजकीय पक्षांकडून महापालिका निवडणूक तयारी सुरू

•पुणे पुस्तक महोत्सवातील पुणे लिट फेस्टचं बिहारचे राज्यपाल आरीफ मोहम्मद खान यांच्या हस्ते उद्घाटन

•२४ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात पिफ १५ ते २२ जानेवारी दरम्यान होणार

•आणि

•भारत आणि दक्षिण अफ्रिकेतील वीस षटकांचा चौथा क्रिकेट सामना आज लखनऊमध्ये

**<u>संसद</u>**

केंद्रिय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी काल लोकसभेत विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजिविका अभियान विधेयक अर्थात विकसित भारत जी राम जी विधेयक सादर केलं. २० वर्षांपूर्वीच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अर्थात मनरेगाची जागा हे विधेयक घेईल. विकसित भारत २०४७च्या उद्दीष्टपूर्तीच्या अनुषंगानं या नव्या विधेयकाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. नव्या विधेयकात शंभर ऐवजी १२५ दिवसांची रोजगार हमी सुचवण्यात आली आहे. तसंच पेरणी किंवा कापणीच्या हंगामात एकंदर ६० दिवसांचा कालावधी अधिसूचित करायचा अधिकार राज्यांना दिला आहे. यादरम्यान मनरेगाचं काम थांबवलं जाईल, जेणेकरून शेतीतल्या कामांना मजुरांची कमतरता भासणार नाही.

मूळ योजनेतून महात्मा गांधींचं नाव काढून टाकल्याचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस, द्रमुक आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू केली आणि हे विधेयक मागे घ्यायची मागणी केली.

कैंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सबका बिमा सबकी रक्षा हे विमाविषयक कायद्यांमध्ये सुधारणा सुचवणारं विधेयक काल लोकसभेत सादर केलं.

**<u>महापालिका निवडणूक</u>**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर आता या महापालिकांच्या प्रशासनानंही निवडणूक तयारीची सुरुवात केली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीची अधिसूचना काल प्रसिद्ध झाली.

पुणे महापालिकेतर्फे शहरातील लोकप्रतिनिधींच्या नावांच्या पाट्या झाकण्याचं आणि विविध जाहिरात फलक काढण्याचं काम सुरू झालं आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेनं उमेदवारी अर्ज भरताना आवश्यक असलेला ना हरकत दाखला उमेदवारांना सुलभरीत्या मिळावा, यासाठी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर विशेष ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून दिली आहे.

राजकीय पक्षांनीही या निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. विविध पक्षांच्या परस्परांसोबतच्या तसंच पक्षांतर्गत बैठका, चर्चा यांना वेग आला आहे.

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजपा-महायुती विजयी होईल असा दावा भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची नवी दिल्लीत भेट घेतली आणि महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने चर्चा केली.

महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये राज्यस्तरीय समितीनं शिक्कामोर्तब केल्याशिवाय आघाडीबाबतचा कोणताही निर्णय घेतला जाणार नाही, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. या निवडणुकीबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी २४ आणि २५ डिसेंबर रोजी राज्याच्या संसदीय मंडळाची बैठक होईल, असं ते म्हणाले.

पुणे शहरात काँग्रेस पक्षानं निवडणूक समन्वय समिती स्थापन केली तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं आपल्या एकत्रित धोरणांची चर्चा सुरू केली.

धुळ्यात भाजपा पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवारांची बैठक झाली.

**पुणेलिटफेस्ट**

ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार असल्यानं भारतीय संस्कृती निरंतर आहे. ज्ञान दृष्टी प्राप्त करण्यासाठी साहित्य महत्त्वाचं आहे, असं प्रतिपादन बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी केलं. राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवातील पुणे लिट फेस्टचं उद्घाटन काल खान यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. एकात्मता हा भारतीय ज्ञान परंपरेचा मुख्य बिंदू आहे. साहित्याचा आस्वाद, सज्जनांचे सानिध्य हा अमृतानुभव असतो असं आपल्या परंपरेत मानलं जातं. भारतीय संस्कृती ज्ञान आणि प्रज्ञेच्या संवर्धनाची संस्कृती आहे. अशा शब्दांत आरिफ मोहम्मद खान यांनी साहित्य,संस्कृती आणि परंपरा याबाबतचे विचार मांडले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यावेळी उपस्थित होते. वाचा, ऐका आणि भारत समजून घ्या ही या महोत्सवाची संकल्पना आहे असं मराठे यांनी सांगितलं. तर तरुण वाचतात हे या महोत्सवानं सिद्ध केलं असं राजेश पांडे म्हणाले.

**पिफ**

२४वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात पिफ येत्या १५ ते २२ जानेवारी दरम्यान होणार असल्याचं पिफचे संचालक, ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं. पुणे फिल्म फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. मोहन आगाशे, सतीश आळेकर, समर नखाते आणि अन्य मान्यवर या यावेळी उपस्थित होते.

महोत्सवात जागतिक आणि मराठी चित्रपटांसह एकंदर 140 चित्रपट दाखवले जातील असं सांगून तरुणाईनं आणि प्रामुख्यानं विद्यार्थ्यांनी या महोत्सवाचा अनुभव घ्यावा असं आवाहन जब्बार पटेल यांनी केलं,

ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते गुरुदत्त यांची जन्मशताब्दी यंदाच्या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना असेल, याबाबत आकाशवाणीशी बोलताना जब्बार पटेल म्हणाले ----

**पुरस्कार**

महाराष्ट्र फाउंडेशनचे यंदाचे साहित्य आणि समाजकार्य पुरस्कार काल जाहीर झाले. त्यात दिलीप चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार अरुण खोपकर यांना, तर समाजकार्य जीवन गौरव पुरस्कार नागपुरच्या लीलाताई चितळे यांना जाहीर झाला आहे. डॉ नरेंद्र दाभोळकर स्मृती पुरस्कार पश्चिम बंगालचे मनीष राय चौधरी यांना जाहीर झाला आहे. इतर पुरस्कारांमधे ललित साहित्यासाठी निखिलेश चित्रे यांना, वैचारिक-अंपारपरिक ग्रंथपुरस्कार सोलापूरचे विनय नारकर यांना, तर रा. शं दातार नाटयलेखन पुरस्कार पुण्याचे ऋत्विक व्यास यांना जाहीर झाला आहे. सामाजिक कार्यकर्ता संघर्ष पुरस्कार गडचिरोलीचे प्राध्यापक जावेद पाषा यांना, तर सामाजिक कार्यकर्ता प्रबोधन पुरस्कार पुण्याचे दत्ता देसाई यांना मिळाला आहे. येत्या १७ जानेवारीला पुण्यात पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे.

**साहित्यसंमेलनसंकेतस्थळ**

साताऱ्यात होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या संकेतस्थळाचा प्रारंभ काल संमेलनाचे स्वागताध्यक्ष छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. या संकेतस्थळाद्वारे संमेलनाचं वेगळेपणही सर्वांपर्यंत पोहोचेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. येत्या १ ते ४ जानेवारी दरम्यान साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे.

**शिक्षाकोकाटे**

मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून मिळवलेल्या चार सदनिकांच्या घोटाळ्याप्रकरणी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना काल नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं दोषी ठरवलं. सवलतीच्या दरात घरं मिळवण्यासाठी खोटी कागदपत्रं सादर केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. दरम्यान, राज्य सरकारनं माणिकराव कोकाटे यांची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**आर्चरी**

दुबई इथं नुकत्याच झालेल्या आशियाई युवा पॅरा क्रीडा स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठाची विद्यार्थिनी श्वेता कोवे हिला तीरंदाजीमध्ये वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक मिळालं. या स्पर्धेत मिश्र प्रकारातही तिनं कांस्य पदक मिळवलं.

**क्रिकेटटी२०**

भारत आणि दक्षिण अफ्रिका संघांमधे वीस षटकांचा चौथा क्रिकेट सामना आज लखनऊ इथं खेळला जाणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत दोन सामने जिंकून आघाडीवर आहे.

**क्रिकेट**

१९ वर्षांखालील मुलांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतीय संघानं मलेशियाच्या संघावर ३१५ धावांनी विजय मिळवला. दुबई इथं झालेल्या सामन्यात भारतानं ५० षटकांत ४०८ धावा केल्या. अभिज्ञान कुंडु यानं नाबाद २०९ धावा केल्या तर वेदांत त्रिवेदीनं ९० धावा केल्या.

या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना मलेशियाचे सर्व फलंदाज ३२ षटकांत केवळ ९३ धावांवर बाद झाले. दीपेश देवेंद्रन यानं मलेशियाचे पाच फलंदाज बाद केले.

**हवामान**-

राज्यातला थंडीचा जोर अजूनही कायम आहे. अनेक ठिकाणी किमान तापमान दहा अंशांच्या खाली गेलं आहे.  आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.